**M.A. (PART-II)**

**MARATHI**

**Study of an Ancient Period**

**(PAPER – II) (DEC - 2017)**

QP Code : 28496

[3 Hours] [Total Marks : 100]

सूचना : (१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
(२) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.

१. (अ) "विशिष्ट कालखंडाचा अभ्यास करताना त्या त्या काळातील राजकीय व सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे संदर्भ शोधावे लागतात." या विधानाची साधक बाधक चर्चा करा. २०

**किंवा**

(ब) बहामनीकालीन राजकीय घडामोडींचा प्रभाव महाराष्ट्रीय समाजजीवनावर झाल्यामुळे तत्कालीन मराठी साहित्याला वेगळे वळण प्राप्त झाले कसे ते लिहा.

२. (अ) 'संत एकनाथांच्या लेखनाची विविधता तत्कालीन समाजाच्या विविध अंगाचे दर्शन घडविते' साधार स्पष्ट करा. २०

**किंवा**

(ब) टिपणे लिहा –
१. चतु:श्लोकी भागवत
२. 'रूक्मिणीस्वयंवरातील' सांस्कृतिक संदर्भ.

३. (अ) 'मुक्तेश्वरांच्या काव्यलेखनातून कलात्मकता आणि रसिकता दिसून येते.' साधार लिहा. २०

**किंवा**

(ब) टिपणे लिहा :
१. मुक्तेश्वराचे संक्षिप्त रामायण
२. मुक्तेश्वरी भारताचे लेखन विशेष.

४. (अ) संत तुकारामांच्या अभंगातून तत्कालीन सामाजिक प्रवृतींच्या विविध स्वरूपाचे दर्शन घडते – साधार लिहा. २०

**किंवा**

(ब) टिपणे लिहा –
१. संत तुकारामांच्या अभंगातील प्रबोधन
२. संत तुकारामांचे आत्मनिवेदनपर अभंग.

५. (अ) अन्य धार्मियांनी केलेल्या साहित्य निर्मितीमागे विविध सांप्रदायिक प्रेरणा आढळून येतात, सविस्तर लिहा. २०

**किंवा**

(ब) टिपणे लिहा –
१. दासोपंत
२. ख्रिस्ती काव्याचे गुणविशेष.

-----------

**M.A. (PART-II)**
**MARATHI**
**Theory of Literature**
**(PAPER – IV) (DEC - 2017)**

QP Code : 28636

[3 Hours] [Total Marks : 100]

सूचना : (१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
(२) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.

१. (अ) साहित्याच्या विविध व्याख्यांची चिकित्सा करा. साहित्याचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी त्यांचा कितपत उपयोग होतो ते विशद करा. २०

**किंवा**

(ब) थोडक्यात टिपा लिहा –
१. कांटचा कल्पनाशक्तीचा विचार
२. साहित्याच्या वर्गीकरणामागील वर्णनात्मक भूमिका.

२. (अ) भारतीय व पाश्चात्य साहित्यविचारांतील प्रयोजन विचारांची मांडणी करा. २०

**किंवा**

(ब) टिपणे लिहा –
१. वाङ्मयीन वादः संकल्पना
२. स्वच्छंदवादाचे ठळक विशेष.

३. (अ) साहित्याच्या मूल्यमापनासाठी सौंदर्यमूल्याबरोबर सौंदर्येतर मूल्यांची गरज असते का ? चर्चा करा. २०

**किंवा**

(ब) टिपणे लिहा :
१. रोमान याकोबसनचा समांतरतेचा सिद्धांत
२. साहित्यप्रकाराची विशुद्धता

४. (अ) 'शैली' म्हणजे काय ते स्पष्ट करून साहित्याच्या संदर्भात शैलीचा विचार कसा करता येईल ते सांगा. २०

**किंवा**

(ब) टिपणे लिहा –
१. साहित्यकृतीची सात अंगे
२. साहित्याच्या स्वरूपाविषयी भारतीय साहित्यशास्त्राची भूमिका.

५. (अ) अस्तित्ववाद म्हणजे काय ? अस्तित्ववादाचे ठळक विशेष स्पष्ट करा. २०

**किंवा**

(ब) टिपणे लिहा –
१. नियमोल्लंघनाचे तत्त्व
२. साहित्यकृतीच्या महानतेचे निकष.

-----------

**M.A. (PART-II)**
**MARATHI**
**Applied Criticism**
**(PAPER – VI) (DEC - 2017)**

Q.P. Code : 28708

वेळ तीन तास एकूण गुण १००

सूचना: १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
३) प्रश्न क्र. ५ ला अंतर्गत पर्याय नाही.

प्रश्न क्र. १ (अ) "एकापेक्षा अधिक समीक्षापद्धतींचा वापर साहित्यकृतीच्या मूल्यमापनास उपकारक ठरतो"- चर्चा करा.

किंवा

(आ) साहित्यसमीक्षेच्या विविध टप्प्यांचा परिचय करून देऊन 'वाङ्मयीन अर्थनिर्णयन' व 'मूल्यमापन' या टप्प्यांचा सविस्तर परिचय करून द्या.

प्रश्न क्र. २ (अ) समाजशास्त्रीय व मार्क्सवादी समीक्षा पद्धतीच्या सामर्थ्यांचा व मर्यादांचा सविस्तर परिचय करून द्या.

किंवा

(आ) सार्वत्रिक अचेतन मन (Universal Unconscious) व साहित्यकृती यांच्यातील संबंध आदिबंधात्मक समीक्षा पद्धतीत कसा वापरला जातो, ते सविस्तर सांगा.

प्रश्न क्र. ३ (अ) रूपबंधाची संकल्पना स्पष्ट करून रूपवादी समीक्षा पद्धतीच्या सामर्थ्यांचा व मर्यादांचा परिचय करून द्या.

किंवा

(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कवितांची रूपवादी समीक्षा करा.

क. नट
ख. ज्ञानदेव गेले तेव्हा
ग. तुझं माझं काही नाही
घ. ग्लोबल वॉल्स

प्रश्न क्र. ४ (अ) फ्रॉईड व यूंग यांच्या सिद्धांतांचा मानसशास्त्रीय समीक्षेवर कशा प्रकारे प्रभाव पडला आहे?

किंवा

(आ) 'सावित्री' या कादंबरीची मानसशास्त्रीय समीक्षा करा.

प्रश्न क्र. ५ 'राजा ईडिपस' या कादंबरीची रूपवादी समीक्षा करा.

---0---

**M.A.(PART-II)**
**MARATHI**
**Dalit sahitya**
**(PAPER – VIII) (DEC - 2017)**

**QP CODE : 28641**

**( ३ तास )** **गुण : १००**

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
(२) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.

प्र.१ (अ) दलित साहित्याच्या विविध व्याख्या सांगून दलित साहित्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) आंबेडकरपूर्व, आंबेडकरकालीन आणि आंबेडकरोत्तर सामाजिक चळवळींचा परामर्श घ्या.

प्र.२ (अ) 'सायरनचे शहर' या संग्रहातील कवितांचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) 'वाट तुडवताना' या आत्मकथनातील विविध स्तरीय अनुभवविश्व याविषयी चर्चा करा.

प्र.३ (अ) प्रचलित मराठी साहित्य आणि दलित साहित्य याविषयी डॉ.गंगाधर पानतावणे यांची भूमिका स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) 'शूद्र' कादंबरीतील नागनाथच्या विविध पातळ्यांवरील संघर्षाची विविध रुपे स्पष्ट करा.

प्र.४ (अ) 'परिव्राजक' मधील कथा बुध्द धम्माची तत्त्वे प्रकट करतात' कसे ते साधार स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) 'निब्बाण' या नाटकातून भूतकाळ, भविष्यकाळ आणि अस्वस्थ वर्तमान यावर प्रकाशझोत टाकलेला दिसून येतो. या विधानाची सत्यता पटवून द्या.

प्र.५ टीपा लिहा : (**कोणत्याही दोन**)

(अ) 'सायरनचे शहर' मधील विद्रोह
(ब) उत्तम कांबळे यांची समाजसेवा
(क) 'परिव्राजक' मधील संस्कृती संघर्ष
(ड) 'शुद्र' कादंबरीची भाषाशैली

-----------------------------

**M.A.(PART-II)**

**MARATHI**

**Lok sahitya**

**(PAPER – VIII) (DEC - 2017)**

**QP CODE : 28639**

**( ३ तास )** **गुण : १००**

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहेत.
(२) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.

प्र.१ (अ) ''लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे'' या विधानाच्या आधारे लोकसाहित्याचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

(ब) 'लोकमानस' व 'लोकदैवत' या संकल्पनांच्या आधारे लोकसाहित्याचे स्वरूप कसे स्पष्ट करता येईल ते सांगा.

प्र.२ (अ) लोकगीत म्हणजे काय ते सांगून लोकगीतांचा लोकजीवनाशी असणारा संबंध सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) 'गोंधळ' किंवा 'दशावतार' या लोकनाट्य प्रकाराचे स्वरूप सांगून त्याचे लोकजीवनातील महत्व विशद करा.

प्र.३ (अ) 'मराठी लोककथा' मधून भारतीय लोकसंस्कृतीचे दर्शन कसे घडते ते सांगा.

**किंवा**

(ब) 'मराठी लोककथा' मधील कथाविश्व विविधांगी कसे आहे ते उदाहरणांसह स्पष्ट करा.

प्र.४ (अ) 'रानभूल' या नाटकात आदिवासींच्या शोषणाचे दर्शन कसे घडविले आहे?

**किंवा**

(ब) 'रानभूल' या आदिवासी नाटकाचे वेगळेपण सांगा.

प्र.५ (अ) 'लोकमानसातील पारंपरिक कोळीगीते' या लोकगीत संग्रहाच्या आधारे कोळी लोकजीवन–लोकपरंपरा आणि कोळीगीते यांचा परस्पर अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) 'लोकमानसातील पारंपरिक कोळीगीते' मधील कोळी गीतांत परंपरा, सण–उत्सव व लोकदैवत यांचे येणारे संदर्भ साधार लिहा.

-----------------------------